दरपत्रकाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी श्री व्ही. स्वामी आर्ठ नांदेड यांची असुन दर रु. 14,17,500/- इतके आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संदर्भ क्रं. 02 अन्वये संबंधीतास वाटाघाटी पाचारण केले असता संबंधीतांनी प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सदर दर रु. 14,17,500/- च्या ऐवजी रुपये 14,00,000/- सर्व करांसहित करण्यास तयार असल्याचे लेखी समंती दिली आहे.

**करिता नावाशमनपा हद्दीत कौठा येथे महात्मा बसवेश्वर पुतळा परिसरात त्यांच्या जिवन चारित्रावरील व अनुभव मंटप कलाकृती (म्युरल) FRP मध्ये बसविणेसाठी श्री व्ही स्वामी आर्ट, नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती रुपये 14,00,000/- दर मंजुरीस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

**विषय क्रं. 10**

**विषय :-** <u>मानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.</u>

घनकचरा व्यवस्थापन व शहर स्वच्छतेच्याकामांच्या परिणामकारक व्यवस्थापनाकरीता राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी माहिती तंत्रज्ञानावर आधारीत प्रमाणालीच्या (ICT Based Technology) वापर बंधनकारक असल्याचा शासन निर्णय क्रं. स्वमअ-2021/प्र.क्र.12(3)/नवि-34 दिनांक 07 ऑक्टोंबर 2021 रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

शहरातील कच-याचे संकलन, वर्गीकरण, वाहतूक व शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याबाबतच्या तसेच सार्वजनिक व सामुदायीक शौचालयामधील स्वच्छता व सुस्थितीबाबत नागरीकांचे अभिप्राय नोंद प्रणाली, शहरातील रस्त्यावरील स्वच्छेतेबाबत संनियंत्रण यंत्रणा, मल निस्सारण वाहीन्यांच्या स्वच्छतेबाबत सनियंत्रण यंत्रणा, शहरातील स्वच्छते बाबत नागरीकांचे अभिप्राय नोंदविण्याकरीता विशिष्ट क्रमांक उपलब्ध करुन देणे, Local App तयार करणे व आधुनिक टेलिकॉम बेस्ड तंत्रज्ञानाच्या माध्यमाने स्वच्छ भारत अभियानाचा प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे. या सर्व बाबी विचारात घेता, घनकचरा व्यवस्थापन व शहर स्वच्छतेच्या कामांच्या परिणामकारक व्यवस्थापनाकरीता राज्यातील सर्व नागरीक स्थानिक स्वराज्य संस्थांनी माहिती तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीचा (ICT Based) असल्याचे उक्त शासन निर्णयात नमुद आहे.

यास्तव, Indian Telephone Industries Limited – A Government of India Undertaking या कंपनीकडून पुरविण्यात ICT Based Technology वर आधारित सेवा व त्यांचे दर उपलब्ध करुन घेण्यात आले असून ते खालील तक्त्यात नमूद करण्यात आलेले आहेत तसेच सदर सेवांच्या सविस्तर माहितीचा तपशिल उक्त दिनांक 07 ऑक्टोंबर 2021 रोजीच्या शासन निर्णयातील विवरणपत्र – अ मध्ये नमुद करण्यात आल आहे.

Scanned with CamScanner

| No. | Component | ITI Final Rates Rs. |
|---|---|---|
| 1 | ICT based Waste collection Monitoring Technilogy for Household / Commercial Other Properties | 500/- Per Property + Applicable Taxes |
| 2 | Street Sweeping Monitoring System | 500/- Per Sweeping point + Applicable Taxes |
| 3 | Liquid Waste cleaning Monitoring System | 500/- Per Liquid Waste cleaning point + Applicable Taxes |
| Kindly note that prices mentioned for above 3 components on the table are for first year only and price for first year includes installation of the system and operation and maintenance of the system for the first year only. From the second year onwards, Operation and Maintenance cost for the technology shall be at 15% per year up to the period of seven years. | | |
| 4 | Training for entire technology | 15000/- Per Training + Applicable Taxes |
| 5 | Post Commission on Field Support | 10000/- per person per month + Applicable Taxes |

करीता उक्त कामासाठी लागणारा निधी 15व्या वित्त आयोगाच्या निधीत शिल्लक नसल्याने, सदरच्या कामासाठी लागणारा निधी जिल्हा वार्षिक योजना निधी, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना निधी, आदिवासी विकास कल्याण योजना निधी, नाविन्यपूर्ण योजनांचा निधी, नगरोत्थान योजना निधी, दलितेत्तर योजना निधी अथवा इतर निधी उपलब्ध करुन देणेसाठी प्रस्ताव सादर करणे तसेच घनकचरा संकलन प्रक्रियेच्या सनियंत्रण करीता ICT BASED TECHNOLOGY च्या अमलबजावणीसाठी उक्त शासन निर्णया सोबतच्या विवरणपत्र-ब नुसार ITI Ltd. यांच्यासोबत थेट करारनामा करणेस्तव येत्या मनपाच्या स्थायी समिती सभेत चर्चा करुन सदरचा प्रस्ताव उक्त निधी मिळणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास्तव व निधी प्राप्त झाल्यानंतर करारनामा करण्यास मंजूरी देणेबाबत प्रस्ताव सादर.

**विषय क्रं. 11**

**विषय :-** नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत नावाशमनपा हद्दीत माता गुजरीजी विसावा उदयानात साहसी खेळांचे पार्क (Adventure Game Park) विकसीत करणे (साहसी खेळांचे साहित्य बसविणे + स्थापत्य विषयक कामे) करणे.

**संदर्भ :-** मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे प्रशासकिय मान्यता आदेश क्रं. जिनिस/दिनांक 24.12.2021 रुपये 02,04,98,000/-

नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत नावाशमनपा हद्दीत माता गुजरीजी विसावा उदयानात साहसी खेळांचे पार्क (Adventure Game Park) विकसीत करणे (साहसी खेळांचे साहित्य बसविणे + स्थापत्य विषयक कामे) करणेसाठी रुपये 1,74,64,061/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/सावांवि/10278/2021 दिनांक 31.12.221 अन्वये दैनिक सकाळी विभागीय पातळी / दैनिक पुढारी विभागीय पातळी / दैनिक प्रजावाणी नांदेड या वर्तमान पत्रातुन दिनांक 02.01.2022 रोजी ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकुण 05 निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी (02) अपात्र व (03) पात्र निविदा, निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 04.02.2022 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | सुमीत स्पोर्टस प्रा.लि. अन्ड एबीएस सिमेंट स्ट्रक्चरल कंपनी (जेव्ही) | अंदाजपत्रकीय दर |
| 02 | मो. वहीदोद्दीन मो. नीजामोद्दीन अन्ड फ्रिवेल इन्फा.प्रा.लि. (जेव्ही) | 3.00% जास्त दर |
| 03 | सन्मान कन्सट्रक्शन झेनिथ स्पोर्टस (जेव्ही) | 6.11% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा सुमीत स्पोर्टस प्रा.लि. अन्ड एबीएस सिमेंटर स्ट्रक्चरल कंपनी, (जेव्ही) यांची असुन जी अंदाजपत्रकिय दराची आहे.

Scanned with CamScanner

करिता नावाशमनपा हद्दीत माता गुजरीजी विसावा उदयानात साहसी खेळांचे पार्क (Adventure Game Park) विकसीत करणे (साहसी खेळांचे साहित्य बसविणे + स्थापत्य विषयक कामे) करणेसाठी सर्वात कमी दराची निविदा सुमीत स्पार्टस प्रा.लि. अन्ड एबीएस सिमेंट स्ट्रक्चरल कंपनी, (जेव्ही) यांची अंदाजपत्रकीय + GST या दराने संविदा करणेकामी मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 12**

**विषय :- जिल्हा वार्षीक योजना सन 2021-22 अंतर्गत बंदाघाट, नांदेड येथे 500 KLD क्षमतेचे, प्रभाग क्रं. 12 मधील मौसंबी मल्ला येथे 300 KLD क्षमतेचे, प्रभाग क्रं. 07 मधील (साईट क्रं. 34) श्रावस्तीनगर, येथे 300 KLD क्षमतेचे, प्रभाग क्रं. 03 मधील गौतमनगर, सांगवी येथे 250 KLD क्षेमतेचे, व गोवर्धन घाट येथे 300 KLD क्षेमतेचे विकेंद्रीकृत मलशुध्दीकरण प्रकल्प उभारणे बाबत.**

नांदेड शहरातील विद्यमान मलनिस्सारण व्यवस्था सुधारणेसह शहरातील नागरीकांना मुलभुत नागरी सुविधा तत्परतेने उपलब्ध करुन देऊन त्याच बरोबर गोदावरी नदी प्रदुषणास प्रतिबंध करणेसाठी बंदाघाट, नांदेड येथे 500 KLD क्षेमतेचे, प्रभाग क्रं 12 मधील मौसंबीमल्ला येथे 300 KLD क्षेमतेचे, प्रभाग क्रं. 07 मधील (साईट क्रं. 34) श्रावस्तीनगर, येथे 300 KLD क्षेमतेचे, प्रभाग क्रं. 03 मधील गौतमनगर, सांगवी येथे 250 KLD क्षेमतेचे व गोवर्धन घाट येथे 300 KLD क्षमतेचे विकेंद्रीकृत मलशुध्दीकरण प्रकल्प Decentralized Packaged Waste Water Treatment Plant (STP) कार्यान्वीत करणे अत्यंत आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने बंदाघाट, नांदेड येथे 500 KLD क्षेकतेचे, प्रभाग क्रं. 12 मधील मौसबीमल्ला येथे 300 KLD क्षमतेचे, प्रभाग क्रं. 07 मधील (साईट क्रं. 34) श्रावस्तीनगर, येथे 300 KLD क्षमतेचे, प्रभाग क्रं. 03 मधील गौतमनगर, सांगवी येथे 250 KLD क्षमतेचे व गोवर्धन घाट येथे 300 KLD क्षेमतेचे विकेंद्रीकृत मलशुध्दीकरणे प्रकल्प Decentralized Packaged Waste Water Treatment Plant (STP) कार्यान्वीत करण्याकरीता महानगरपालिकेने सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांनी जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) सन 2021-22 मधील नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत नांदेड येथे 500 KLD क्षमतेचे, प्रभाग क्रं. 12 मधील मौसंबीमल्ला येथे 300 KLD क्षमतेचे, प्रभाग क्रं. 07 मधील (साईट क्रं. 34) श्रावस्तीनगर येथे 300 KLD क्षमतेचे, प्रभाग क्रं. 03 मधील गौतमिनलगर सांगवी येथे 250 KLD क्षमतेचख व गोवर्धन घाट येथे 300 KLD क्षमतेचे प्रकल्पासाठी रुपये 505.30 लक्ष असे एकुण रुपये 505.30 लक्ष एवढया खर्चास दिनांक 15.12.2021 रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच सदरील मलशुध्दीकरण प्रकल्प उभारणीसंदर्भात मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली बैटक घेण्यात आली असता सदरील कामाबाबतची सर्व कार्यवाही आयुक्त महानगरपालिका यांनी पूर्ण करावी असे बैठकीत निर्देशीत करण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने सदरील निविदा प्रक्रिया पूर्ण करुन घेण्यासाठी दि. 24.12.2021 रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदरील निविदा प्रक्रियेत एकूण 02 निविदाधारकांनी सहभाग नोंदविलेला असुन तांत्रिक अर्हता तपासली असता दोन्ही निविदाधारक पात्र आहेत. सदरील निविदा प्रक्रियेचा पुढील भाग म्हणून प्राप्त दर उघडण्यात आले असता त्यांच्या दरासंदर्भात तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारक | अंदाजपत्रकीय किमंत | कंत्राटदाराने भरलेले दर | % जास्त | % कमी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | मे. लाईफ फर्स्ट कॉन्सेप्ट अन्ड टैक्नॉलॉजी प्रा. लि.पुणे | (45116597.00) | (44981247.21) | -- | 0.30% |

Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 02 | मे. आयडीयल सिस्टीम पुणे | (45116597.00) | (45567762.97) | 1.00% | -- |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त 02 निविदाधारक पैकी सर्वात कमी दर हे मे. लाईफ फर्स्ट कॉन्सेप्ट अन्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि. पुणे यांचे असून ते अंदाजपत्रबक दरापेक्षा 0.30% कमी दराने प्राप्त झालेले आहेत. सदरील कामावर मंजुर निविदे नुसार लागणारा खर्च सालसन 2021-22 या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) यार लेखा शिर्षकातून करण्यात येईल. तरी मे. लाईफ फर्स्ट कॉन्सेप्ट अन्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि. पुणे या कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करण्याकरिता प्रस्ताव स्थायी समितीच्या पटलावर सादर.

**विषय क्रं. 13** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अग्निशमन विभागतील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशासना तर्फे फ्रिरेन्ट कॉर्टर धत्तीरवर निवासस्थान देण्यात येत होते. त्यामध्ये सेवानिवृत्त श्री (1) एस. एस. सरोदे अग्निशमन अधिकारी (से.नि) 10 वर्षे निवासस्थान सोडले नाही. पोलीस कार्यवाही करुन निवासस्थान खाली करुन घेतले (2) एम.ए. रज्जाक अग्निशमन अधिकारी (से.नि) 05 वर्षे निवासस्थान सोडले नाही. पोलीस कार्यवाही करुन निवासस्थान खाली करुन घेतले. (3) आर.आय. जोजन, फायरमन (से.नि) (4) एन.एन. तुरे वाहन चालक (सेनि) (5) बी. डब्ल्यु वाघमारे वाहन चालक (सेनि) (6) ए.जी. जहागीरदार लिडींग फायरमन (सेनि) (7) ए.आर.रहेमान फायरमन (सेनि) (8) रुबी फ्रान्सीस हॅरी शिपाई (सेनि) इ. अधिकारी व कर्मचारी यांना फ्रीरेन्ट कॉर्टर देण्यात आले होते.

संबंधीत कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर किमान 03 वर्षे त्यांचे सेवा पदानाची रक्कम कार्यानलयाकडून मिळत नव्हती तो पर्यंत सदर अधिकारी / कर्मचारी हे देण्यात आलेल्या निवासस्थानातच राहत हाते. त्यांचेकडून नियमानुसार घरमाडे वसुल करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.

श्री जोगदंड यांनी उपदानाची रक्कम मिळेपर्यंत नियमानुसार घरभाडे वसुल करण्यावावत विंनती अर्ज केला होता. श्री जोगदंड केवळ मागासवर्गीय असल्यामुहे महाराष्ट्र शासन सामान्य पशासन विभाग शासन निर्णय क्रं. अनिवा/1095/प्र.क्र.807/95/23-अ मंत्रालय मुंबई दिनांक 10.09.1996 चा संदर्भ देऊन श्री जोगदंड अग्निशमन अधिकारी यांचेकडून घरभाडे वसुली करण्याचा आदेश्या निर्गमीत करुन श्री जोगदंड यांचेवर कठोर अन्याय केला आहे. वर नमुद शासन निर्णय महापालिकेस लागु नसतांना तसा बेकायदेशीर आदेश निर्गमीत केला आहे.

उक्त नमुद सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे ताब्यात अनेक वर्षे सेवानिवृत्त झाल्यानंतरही कार्टर त्यांचे ताब्यात असतांना देखील कोणाचेही विरोधात कोणतीच कार्यवाही प्रशासनाने केली नाही. केवळ श्री जोगदंड यांचेवरच अशी कठोर कार्यवाही करुन त्यांचेवर अन्याय केला आहे.

सबब वरील सर्व बाबींचा सखोल अभ्यास करुन ही स्थायी समिती सर्वानुमते असा ठराव पारीत करते की श्री जोगदंड यांचे केवळ अन्याय झालेला आहे. एकास एक व दुस-यास एक असा निर्णय सामाजिक न्यासय तत्वानुसार घेता येत नाही. सर्वांना एक समान न्याय यावयास पाहीजे या तत्वानुसार श्री जोगदंड यांचेकडून वसुल करण्यात येणारे घरभाडे वसुलीचा निर्गमीत केलेला आदेश याव्दारे रद्द करण्यात येतो व श्री जोगदंड यांचेकडुन कसलेही घरभाडे घेण्यात येऊ नये असाही ठराव एकमताने समंत करण्यात येतो. श्री जोगदंड यांची सेवानिवृत्तीची कार्यवाही तात्काळ प्रशासनाने करावी असाही ठराव समंत करण्यात येतो. ठरावाचे इतिवृत्तास आजच कायम करण्यात येतो.

**सुचकः-** अ. हफीज अ. करीम

**अनुमोदक :-** सौ. कविता संतोष मुळे

Scanned with CamScanner

विषय क्रं. 14

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मलेरिया विभागात सालसन 2003 ते 2005 या कालावधीत दरम्यान नियुक्त व मागील 17 ते 18 वर्षा पासुन 35 कर्मचारी रोजंदारीवर मजुर या पदावर कार्यरत आहे हे वर्ग-4 संवर्गातील पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्याने त्यांच्या मागील प्रदिर्घ रोजंदारी सेवा कालावधीचा आणि त्यांच्या सेवानिवृत्तीकडे झुकलेल्या वयाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन महापालिका आस्थापनेवर मंजुर असणा-या वर्ग-4 संवर्गातील रिक्त पदांवर महापालिकेच्या नियमीत सेवेतसामावुन घेण्यास एक वेळ विशेष बाब म्हणुन त्यांना सामावुन घेण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचक :- फरहत सुलताना खुर्शीद जागीरदार अनुमोदक :- अ. हफीज अ. करीम

प्रशासकिय टिप्पणी

कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/2032/2021 दिनांक 08.06.2021 च्या पत्राव्दारे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील हिवताप निर्मुलन योजने अंतर्गत जिवशास्त्रज्ञ मनपा, नांदेड यांना सालसन 2003 ते 2005 या कालावधीमध्ये दैनिक मजुरीवर घेतलेले 36 मजुरांना विशेष बाब म्हणून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत स्थायी करण्याबाबत मान्यता देण्यात यावी असे शासनास कळविले होते.

करिता शासनाने पत्र क्रं. नामपा/2021/प्र.क्र.167/नवि-24 दिनांक 28 जुलै 2021 अन्वये महानगरपालिकेतील / नगरपरिषदेमधील दिनांक 27.03.2000 नंतरचे रोजंदारी कर्मचा-यांच्या सेवा नियमित करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही त्यामुळे या प्रकरणातील सदर 36 रोजंदारी कर्मचा-यांचे नियमित समावेश करण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव सद्यस्थितीत मान्य करता येणार नाही.

विषय क्रं. 15 अपिल दिनांक 03.01.2022 प्राप्त दि. 05.01.2022

प्रति,
मा. सभापती,
स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

विषय :- वार्षिक वेतनवाढ सुरु करणे करिता अपिल स्विकारणे बाबत

संदर्भ :- 1) जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/11240/13 दि. 02.09.2013
2) जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/3827/14 दि. 28.05.2014

महोदय,

वरील विषयी विनंती की, मला संदर्भीय आदेशान्वये एक वार्षिक वेतनवाढ कायम ढस्वरुपी मोठपवून विभागीय चौकशीच्या अधिन राहुन कामावर पुनःस्थापित करण्यात आले आहे त्याअनुषंगाने मी स्वच्छता मोहिममध्ये रुजु झालो आहे.

माझ्या घरची परिस्थिती गरीबीची असुन घरात दुसरा कमवता व्यक्ती नसल्यामुळे सर्व जवाबदारी माझ्यावर आहे माझी संदर्भ क्रं. 02 च्या आदेशान्वये कायमस्वरुपी गोठवलेली वार्षिक वेतनवाढ पुर्ववत सुरु करावी जेणे करुन माझ्यावर आर्थीक संकट कोसळणार नाही यापुढे मी प्रमाणिकपणे माझी नौकरी करीन.

Scanned with CamScanner

करिता महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) नुसार स्थायी समितीस प्राप्त अधिकारात माझे अपिल स्विकारुन मला न्याय दयावा स्थायी समितीसमोर अपिल करण्यास झालेला विलंब क्षमपित करुन मला झालेला दंड कमी करण्यात यावरा ही नम्र विनंती.

अर्जदार
स्वाक्षरीत/-
प्रकाश मधुकर जोंधळे
पुरुष मजुर, मनपा नांदेड
अरब गल्ली दवाखाना

<u>प्रशासकिय टिप्पणी</u>

श्री प्रकाश मधुकर जोंधळे, पुरुष मजुर, अरबगल्ली दवाखाना मनपा, नांदेड यांनी मा.सभापती स्थायी समिती मनपा, नांदेड, यांचेकडे अपिल दाखल करुन त्यांनी कार्यालय आदेश क्रमांक नांवाशमनपा/आस्था-/11240/13 दि.02.09.2013 व कार्यालय आदेश क्रमांक नांवाशमनपा/आस्था-/3827/14 दि.29.05.2014 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 56 (2) मधील तरतुदीनुसार एक वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी गोठविण्यात आलेली असून निलंबन प्रकरणी चौकशीच्या अधिन राहुन संबंधितास कामावर पुनस्थापित आले आहे. सदरील त्यांच्या घरची परिस्थिती गरीबीची असून घरात दुसरा कमवता व्यक्ती नसल्यामुळे सर्व जबाबदारी त्यांच्यावर आहे कायमस्वरुपी गोठविण्यात आलेली वार्षीक वेतनवाढ पुर्ववत सुरु करावी जेणे करुन आर्थिक संकट कोसळणार नाही यापुढे प्रमाणिकपणे नौकरी करीन असे त्यांनी विनंती केली आहे.

श्री प्रकाश मधुकर जोंधळे, पुरुष मजुर, अरबगल्ली दवाखाना मनपा, नांदेड यांना निलंबन प्रकरणी कार्यालयीन ज्ञापन क्र.नांवाशमनपा/आस्था-3/23766/2013 दि.23.12.2013 अन्वये मनपा साफसफाई विभागात कार्यरत असताना विना परवानगी गैरहजर राहुन नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण करण्यास कारणीभुत असणे, सदर प्रकरणी वारंवार सुचाना देवुन सुध्दा विना परवानगी गैरहजर राहणे या कारणांसाठी ज्ञापन जोडपत्र 1 ते 4 देवून खुलासा मागविण्यात आला होता.

संबंधितांने ज्ञापन व जोडपत्र 1 ते 4 चा खुलासा सादर केला त्यांच्यावर लावण्यात आलेले दोषारोप अमान्य केल्यानुसार विभागीय चौकशी चालु करण्यात आली व संबंधितास कार्या.आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-3/33572/13 दि. 29.03.2014 अन्वये चौकशीच्या अधिन राहुन कामावर पुन:स्थापित करण्यात आले. तद्नंतर विभागीय चौकशी अंती जोडपत्र 1 ते 4 नुसार लावलेले दोषारोप सिध्द झाले आहेत त्यानुसार त्यांना कार्या.आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-3/3827/2014 दिनांक 25.05.2014 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 56 (2) मधील तरतुदीनुसार एक वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी गोठविण्यात आलेली आहे.

तथापि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56 (4) मधील तरतुदीनुसार ज्या कोणत्याही नगरपालिका अधिका-यास / कर्मचा-यास महानगरपालिका व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आलेले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आलेले असेल, त्यास खालच्या पदावर आणण्याचा, काढून टाकण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा आदेश त्यास कळविल्यापासून (01) महिन्याच्या आत ज्या प्राधिका-यांने शास्ती लादली असेल त्यांच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपिल करता येईल. आणि अपिल प्राधिका-यास, ज्या प्राधिका-याने शास्ती

लादली असेल, त्यांच्याकडून अभिप्राय मिळविल्यानंतर दिलेला आदेश कायम करता येईल, किंवा अशा आदेशा ऐवजी त्यास न्याय वाटेल असा आदेश देता येईल. अपिल प्राधिकाऱ्यांने दिलेला आदेश तात्काळ अमलात येईल. व तो निर्णायक असेल.

श्री प्रकाश मधुकर जोंधळे, पुरुष मजुर यांना उपरोक्त तरतुदीमधील शास्ती लादण्यात आलेली नसून त्यांच्यावर फक्त किरकोळ शास्ती लादण्यात आलेली आहे. करिता सदरील बाब स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन दयावी.

विषय क्रं. 16 अपिल दि. 10.01.22 प्राप्त दि. 13.01.22

प्रति,

मा. सभापती

स्थायी समिती,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) मधील तरतुदीनुसार अपिल

विरुध्द इंजिनीयर या पदासाठी वेतनश्रेणी 4500-7000 ऐवजी रु. 5500-9000 लागु करणे बाबत

महोदय,

मा. सभापती महोदय यांचे न्यायालयात मी दिनांक 07.02.2020 रोजी घेण्यात आलेल्या निवड समितीचे निर्णया विरुध्द अपील करीत आहे.

हे की. माझी नियुक्ती नांदेड नगरपालिका कार्यालयात दि. 08.04.1992 रोजी पंप ऑपरेटर या पदावर झाली. पंप ऑपरेटर या पदावरुन मला दि. 21.01.12 रोजी शासन मान्यता संचालक, नपा प्रशासन मुंबई यांचे आदेश क्रं. एमसीए-2872-31/13829 दि. 01.10.1983 या शासन मान्य शिफ्ट इंजिनियर पदावर पदोन्नती झाली.

हे की, शिफ्ट इंजिनियर व कनिष्ठ अभियंता हि पदे समान वेतनश्रेणीतील व कामाचे स्वरुप साखेच आहे.

हे की, शिफ्ट इंजिनियर या पदावर वेतनश्रेणी रुये 4500-7000 मध्ये पदोन्नती झाली.

हे की, माझ्या पदास कनिष्ठ अभियंता या पदाची वेतनश्रेणी 5500-9000 पाचव्या वेतन आयोगानुसार मिळावी म्हणुन सर्वसाधारण ठराव क्रं. 114 दि. 26.08.10 सर्वानुमते ठराव समंत करण्यात आला.

हे की, सदरच्या ठरावाचे अमलबजावणी करण्यासाठी अनेक वेळा विनंती केली. भुतपूर्व आयुक्तांनी आचारसंहिता संपल्यानंतर आदेश काढा असे पृष्ठांकन केले तथापी हेतुपुरस्पर रित्या प्रकरणास वेगळे वळण देवुन शिफ्ट इंजिनियर या पदास चुकीचे वेतनश्रेणी रुपये 4500-7000 देवुन माझ्यावर अन्याय केला आहे.

हे की, शिफ्ट इंजिनियर या पदावर पदोन्नती दिल्यानंतर वेतनश्रेणी रुपये 4400-7000 ऐवजी वेतनश्रेणी रुपये 5500-9000 लागु करण्यासाठी सर्वप्रथम मा. औद्योगिक न्यायालय जालना येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ केले होते त्यामध्ये संबंधीतास तिन महिण्याच्या आत वेतनश्रेणी लागु करावी असा निर्णय झाला होता.

हे की, तथापी महापालिकेने सदर निर्णया विरुध्द मा. उच्च न्यायलय खंडपिठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या याचिका क्रं. 11908/2016 मध्ये दिनांक 24.02.17 रोजी प्रस्तुत प्रकरणी गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा असे आदेश झाले होते.

Scanned with CamScanner

हे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील क्र. 51 मधील तरतुदीनुसार तत्कालीन आयुक्त यांनी कार्यालयीन पत्र क्र. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-5/2232 दि. 07.05.2017 व नंतर कार्यालयीन पत्र क्र. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-5/13225 दि. 04.12.2017 रोजी संबंधितास मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे झालेल्या निर्देशानुसार शिफ्ट इंजिनियर या पदासाठी वेतनश्रेणी रुपये 5500-9000 लागु करण्याबाबत शासन स्तरावरुन निर्देश होण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता.

हे की, कक्ष अधिकारी नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई-32 यांनी त्यांचे दि. 07.05.18 च्या पत्राच्या अनुषंगाने महापालिकने शासनाकडे दि. 04.12.17 रोजी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महापालिकेतील कनिष्ठ अभियंता व शिफ्ट इंजिनियर हि समकक्ष पदे असुन त्यांचे कर्तव्य व जबाबदा-या समान आहेत त्यामुळे महापालिका नियुक्ती प्राधीकरण असल्यामुळे सुधारित वेतनश्रेणी रुपये 5500-9000 लागु करण्यास सक्षम असल्यामुळे शासन स्तरावरुन निर्देश देण्याची आवश्यकता नाही असे कळविले आहे.

हे की, सदर प्रकरणी प्रथम मा. औद्योगिक न्यायालय तदनंतर मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद व तत्कालीन आयुक्त यांनी शासनास पाठविलेले पत्र सक्षम प्राधीकरणाचे निर्देश व आदेश नजर अंदाज करुन महापालिका निवड समितीने सदर पदास वेतनश्रेणी रुपये 5500-9000 लागु करावयाचे झाल्यास त्यासाठी महापालिका अधिनियमातील कलम 51(4) नुसार शासन मान्यता आवश्यक असल्याचा निर्णय देवुन माझ्यावर अन्याय केला आहे.

हे की, शिवाय निवड समितीने तत्कालीन आयुक यांनी प्रथम 07.05.17 व 04.12.17 रोजी शासनाकडे प्रस्ताव सादर करीत असतांना अस्थापना विभागाने कलम 51(4) चा उल्लेख करणे हि बाबत विचारात घेतलेली नाही शिवाय या प्रकरणी निवड समिती पेक्षा वरिष्ठतम प्राधिकरण म्हणजेच मा. औद्योगिक न्यायालय जालना यांचा निर्णय मा. उच्च न्यायालय खंडपिठ येथे झालेला निर्णया त्यानुसार तत्कालीन आयुक्तांनी पाठविलेला प्रस्ताव या बाबीचा विचार न करता दिलेला निर्णय या माझ्यावर अन्यायकारक आहे.

हे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार मला अपिल करणे विलंब झाला आहे माझ्या मानसीक तणावामफळे व प्रशासनाने मला खोट अश्वासन देवुन वेतनश्रेणी लागु करण्याचे आदेश काढण्यात येतील असे मौखीक सांगीतल्यामुळे मला अपिल करण्यास विलंब झाला आहे.

हे की, मी महोदयांना विनंती करण्यात येते की झालेला विलंब क्षमापित करुन माझे अपिल मान्य करावे.

हे की, मा. सर्वोच्च न्यायालय केस नं. सिव्हिल अप्लीकेशन नं. 3855 ऑफ 2007 या प्रकरणात दिनांक 10.03.2010 रोजी निर्णय देवुन त्यात असे तरतुद आहे की भोळे आयोग चौथा वेतन आयोगा व इतर आयोगात ज्या विविध प्रदान समकक्ष वेतनश्रेणी असेल त्यापुढील आयोगानुसार वेतनश्रेणी देतांना वेगवेगळे वेतनश्रेणी न देता सर्व पदांना कामाचे स्वरुप वेगळे असले तरीही वेतनश्रेणी बदलता येणार नाही असे निर्णयात नमुद आहे. भोळे आयोग चौथ्या वेतन आयोगानुसार शिफ्ट इंजिनियर व कनिष्ठ अभियंता या पदास समान वेतनश्रेणी होती परंतु तदनंतर शिफ्ट इंजिनियर या पदाची वेतनश्रेणी न बदलता केवळ कनिष्ठ अभियंता या पदाची वेतनश्रेणी बदलुन रु. 5500-9000 हि वेतनश्रेणी लागु केली आहे तथापी मी पात्र असतांना माझ्या पदाची वेतनश्रेणी न बदलुन माझ्यावर अन्याय केला आहे.

<u>प्रार्थना</u>

1- मा. महोदयांना विनंती करण्यात येते की, अपीलास झालेला विलंब क्षमपित करुन अपिल मान्य करण्यात यावे.

Scanned with CamScanner

2- दि. 07.02.20 रोजीच्या निवड समितीचा निर्णय रद्द करून मा. औद्योगीक न्यायलय जालना यांचा निर्णय व तसेच मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांचा निर्णयाप्रमाणे मी सर्व मेरीट पुर्ण करत असल्याने आणि मा. सर्वोच्च न्यायाल यांच्या तरतुदीनुसार तसेच मनपा सर्वसाधारण ठराव क्रं. 114 दि. 16.08.10 च्या अनुषंगाने निवड समितीने केलेल्या शिफारशीची पुर्णतः अमलब जावणी करून शासन मान्य असलेली शिफ्ट इंजिनियर या पदास पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रुपये 5500-9000 लागु करण्यात यावी हि विनंती तसेच फरकाची रक्कम त्वरीत अदा करण्यात यावी ही विनंती.

आपला विश्वासु.

स्वाक्षरीत/-

साहेबराव भागोजी जाधव

शिफ्ट इंजिनियर मनपा नांदेड

**प्रशासकिय टिप्पणी**

श्री साहेबराव भागोजीराव जाधव, शिफ्ट इंजिनियर यांनी मनपा स्थायी समिती सभेसमोर अपिल केले असल्याने खालील प्रमाणे प्रशासकीय अहवाल सादर करण्यासाठी कळविले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानरपालिका आस्थापनेवरील पदे पदोन्नतीने भरण्यासाठी दिनांक 132.10.2011 रोजी संपन्न झालेल्या निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/10606/12 दिनांक 20.01.2012 अन्वये श्री साहेबराव भागोजीराव जाधव यांना शिफ्ट इंजिनियर या पदावर वेतनश्रेणी रुपये 4500-7000 (5200-20200 ग्रेड पे 2800) मये पदोननती देण्यात आली आहे.

तदनंतर संबंधीतांच्या विनंतीनुसार शिफ्ट इंजिनियर या पदास वेतनश्रेणी रु. 5500-9000 (पाचव्या वेतन आयोगानुसार) लागु करण्याबाबत शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आले असता शासनाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे नियुक्ती प्राधिकारी म्हणुन आयुक्त यांनी गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यास सक्षम आहेत, यास्तव आयुक्त यांनी गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा. याप्रकरणी शासन स्तरावरून निर्देश देण्याची आवश्यक्ता नाही असे कळविले आहे.

त्यानुसार शिफ्ट इंजिनियर या पदाच्या वेतनश्रेणीबाबत निर्णय घेण्यासाठी दिनांक 07.02.2020 रोजी निवड समिती आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रं. एनव्हीसी-3020 /1419/प्र.क्र.149/20 नवि-22 दिनांक 22.09.2000 च्या शासन निर्णयानुसार शिफ्ट इंजिनियर या पदाची वेतनश्रेणी रुपये 4000-6000 (पाचव्या वेतन आयोगानुसार) समकक्ष वेतनश्रेणी र. 5200-20200 ग्रेडपे 2400 (सहाव्या वेतन आयोगानुसार) अशी आहे. त्यामुळे शिफ्ट इंजिनियर या अभिनामाच्या पदाची वेतनश्रेणी बदलता येणार नाही. अशी निवड समितीने शिफारस केलेली आहे. त्यानुसार शासनास व संबंधीतास शिफ्ट इंजिनियर या पदाची वेतनश्रेणी बदलता येणार नाही असे दिनांक 28.02.2020 रोजीच्या पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे.

तसेच दिनांक 01.07.2021 रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार वेतनश्रेणी बाबत निर्णय घेण्यात आलेल्या आहे. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/3245/21 दिनांक 07.07.221 च्या आदेशान्वये शिफ्ट इंजिनियर (पाळी अभियंता) हे पद शासन स्तरावर अस्तित्वात असल्याचे कोणतेही शासन निर्णय उपलब्ध नसल्याने निदर्शास आल्यामुळे सदर प्रकरणामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे सदर पदासाठी वेतनश्रेणीसाठी (वेतन बॅंड 5200-20200 ग्रेडपे 2800) अशी असुन नाशिक महानगरपालिकेने सदर पदास (वेतनश्रेणी बॅंक 5200-20200 ग्रेड पे 2800) अशी लागु केली असल्याने तसेच मनपा नांदेड मध्ये सद्यस्थितीत सदर पदास (वेतन बॅंड 5200-20200 ग्रेड पे 2800) अशी लागु असल्यामुळे तिच वेतनश्रेणी कायम करण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

विषय क्रं. 17

अपिल

दिनांक 07.1.22 प्राप्त दि. 31.01.22

प्रति,

मा. सभापती,

स्थायी समिती ,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

विषय :- 1) निवडश्रेणीची कालावधी थकबाकी मिळणे

2) माझा अर्ज दिनांक 10.08.20, (2) 12.10.21

महोदय,

आपणास निवेदन खालील प्रमाणे सादर की मी निवृत्त मुख्याध्यापिका असून मला निवडश्रेणी-2012 साठी प्राप्त झाल्याने मा. आयुक्त व निवडसमितीचया निर्णया विरुध्द न्यायपीठ म्हणून आपणास निवेदन सादर केले आहे आपल्या कार्यालयातील इतर शिक्षकांना निवडश्रेणी नियत तारखेनिहाय Cronologically दिलेली असतांना मला 08 वर्षे तफावत ठेऊन निवडश्रेणी व थकबाकी दिल्याने माझ्यावरील अन्यायाला आपणासमोर (न्यायपीठ) सादर केले आहे.

तरी विनंती मुद्दतीच्या काळावधी नुसार आपण यावर कार्यवाही करुन मला सालसन 2004 ते 2012 या 08 वर्षाच्या कालावधीची थकबाकी इतर शिक्षकवृंदा प्रमाणे मंजुर करावी ही विनंती.

अर्जदार,

स्वाक्षरीत/-

सौ. मंगला माधवराव जोंधळे,

शाविन, 11/249 लेबर कालोनी नांदेड

(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव,
नांवाशमनपा, नांदेड.

( स्वामी किशोर मल्लीकार्जून )
सभापती,
स्थायी समिती, नांवाशमनपा, नांदेड.

Scanned with CamScanner